(नॅकद्वारे A+ दर्जा)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

महाविद्यालयीन (कमवा आणि शिका) योजना : वर्ष २०२६-२७

: परिपत्रक :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे दरवर्षी महाविद्यालयीन स्तरावर कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना महाविद्यालय स्तरावर सुरु करणे बाबतचा निर्णय दि. २६-२७ फेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेमध्ये घेण्यात आलेला आहे. त्याकरिता विद्यापीठामार्फत महाविद्यालयांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता आपल्या महाविद्यालयात ही योजना सुरु करावयाची असल्यास सदर योजना सुरु करण्यासाठीचे आवेदन पत्र भरुन **विद्यार्थी विकास मंडळ विभागात दि. ३१ जुलै २०२६** पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावे. (आवेदनपत्र विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात तसेच विद्यापीठाच्या संकतस्थळावर उपलब्ध आहे.) उशिरा आलेल्या आवेदनाचा विचार केला जाणार नाही. याकरिता महाविद्यालयाने सोबतच्या यादीतील कागदपत्राची पूर्तता करणे अनिवार्य आहे.

सोबत : वरील प्रमाणे

विद्यापीठ प्रांगण ♦
छत्रपती संभाजीनगर ♦
संदर्भ क्र : सविवि/कमवा आणि शिका /२०२६/3865-4312
दिनांक : १० जुलै २०२६ ♦
सोबत : वरील प्रमाणे ♦

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

याची एक प्रत :

१) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) वित्त व लेखाधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) मा. प्र-कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
६) संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
७) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

स्वाक्षरीत/-
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

विद्यार्थी विकास मंडळ

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७

महाविद्यालयीन कमवा आणि शिका योजनेकरिता आवश्यक कागदपत्र

१. विहित नमुन्यातीन आवेदन पत्र (फॉर्म)

२. नॅक मूल्यांकन झालेल्या महाविद्यालयास प्राध्यान्य देण्यात येईल. करिता नॅक मूल्यांकन झाल्याचे प्रमाणपत्र.

३. शैक्षणिक वर्ष २०२४ व २०२५ मध्ये युवा महोत्सवात सहभाग नोंदवल्याचे कोणत्याही एका सहभागीचे प्रमाणपत्र / युवा महोत्सवासंदर्भात दंड वा शुल्क भरल्याची पावती / विद्यार्थी विकास विभागाचे दि. २० नोव्हेंबर २०२५ नंतरचे ना-हरकत प्रमाणपत्र.

४. महाविद्यालयात स्थापन केलेल्या अँटी रॅगींग समिती (Anti Ragging Committee) ची माहिती.

५. महाविद्यालयातील विद्यार्थी तक्रार निवारण समिती (Student Grievance Redressal Committee) ची माहिती

६. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ युवा महोत्सव व लोककला महोत्सवाकरिता सांस्कृतिक समन्वयक नियुक्त केल्याची माहिती

७. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ आविष्कार करिता आविष्कार समन्वयक नियुक्त केल्याची माहिती.

८. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कमवा आणि शिका करिता विद्यापीठाद्वारे अनुदान मिळाले असल्यास उपयोगिता प्रमाणपत्र (युटीलायझेशन) झेरॉक्स.